वर्ष- १२ | अंक- ०४ | मुंबई, मंगळवार, ०९ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

लग्नसोहळ्यात मानानं मिरवो ५ अस्सल मराठी दागिने

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

3 → सैरभैर होण्यामागचे कारण काय?

प्रचाराच्या अंतिम टप्प्यात परंड्यात 'अंधश्रद्धे'चा प्रवेश ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

डेटींग ॲपवर 'हनी ट्रॅप'!!! ऑनलाईन भेट

'ड्रिंक'मध्ये गुंगीचं औषध मुंबईजवळ २ सराईत महिलांकडून पुरुषांना लुटण्याचा थरार!

सीसीटीव्ही आणि तंत्रज्ञानाने झाला छडा

गुन्हा केल्यानंतर आरोपी महिलांनी तात्काळ डेटींग ॲपवरील प्रोफाईल आणि सर्व माहिती डिलीट केली होती. लॉजमध्येही अस्पष्ट आयडी आणि चुकीचे क्रमांक दिले होते. कोणतीही माहिती उपलब्ध नसताना, पोलिसांनी लॉजवरील अस्पष्ट सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाचे जाळे विणले. या आधारावर, मालाड (प.) मुंबई येथील रहिवासी असलेल्या २८ आणि २९ वर्षीय दोन महिला आरोपींना मांडवी पोलिसांनी ताब्यात घेतले. तपासामध्ये महिलांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून चोरीस गेलेला ४.१३ लाख किंमतीचा मुद्देमाल, दागिने, मोबाईल हँडसेट आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.



विरार। ऑनलाईन डेटींग ॲप्सचा वापर करून पुरुष शिकार शोधायची आणि भेटीच्या बहाण्याने त्यांना गुंगीचे औषध देऊन मौल्यवान दागिने आणि वस्तू लुटायच्या, अशा पद्धतीचा वापर करणाऱ्या दोन सराईत महिला आरोपींना मांडवी पोलिसांनी जेरबंद केले आहे. या 'झोपी'च्या डावात अनेक पुरुष गप्प बसत असल्याने महिला आरोपींचा आत्मविश्वास वाढला होता, मात्र पोलिसांनी ही टोळी उद्ध्वस्त केली आहे.

लॉजवर भेट, मग चोरी

विरारमधील एका ३१ वर्षीय पुरुषाने मांडवी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार 'हॅपन डेटींग ॲप'वर ओळख झाल्यानंतर त्याने एका अनोळखी महिलेला भेटण्याचे ठरवले. भेटीसाठी लॉजवर एकत्र आल्यानंतर या महिलेसोबत तिची आणखी एक साथीदार आली. लॉजमध्ये दारू पित असताना फिर्यादीच्या नकळत त्याच्या ड्रिंकमध्ये झोपेच्या गोळ्या टाकण्यात आल्या. फिर्यादी गाढ झोपल्यानंतर त्यांच्या गळ्यातील २ तोळे सोन्याची चेन, मोबाईल आणि स्मार्ट वॉच असे १.८३ लाख किंमतीचे साहित्य चोरून महिला पसार झाल्या.याच पद्धतीने या आरोपींनी दुसऱ्या दिवशी रात्री काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतही एका पुरुषाला लुबाडले होते.

महिला आरोपींचे नियोजन

तपासामध्ये पोलिसांनी एक धक्कादायक बाब उघड केली. या महिला आरोपींनी अनेक पुरुष बदनामीच्या भीतीने तक्रार करणार नाहीत, हे लक्षात घेऊन पूर्ण नियोजनबद्ध पद्धतीने गुन्हे केले होते. पोलिसांनी या गुन्ह्यात गुंगीकारक औषध वापरल्यामुळे आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम १२३ हे वाढीव कलम लावले आहे. या टोळीच्या फसवणुकीचे बळी ठरलेल्या आणि बदनामीच्या भीतीमुळे गप्प बसलेल्या नागरिकांनी निर्भयपणे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

मीटिंगच्या बहाण्याने महिलेला ऑफिसमध्ये बोलावले, बंदुकीच्या धाकावर कपडे उतरवले





मुंबई। देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका व्यावसायिक महिलेचे कपडे काढून तिचा विनयभंग करण्यात आला. हे सर्व एका कॉर्पोरेट ऑफिसमध्ये घडले आहे. बंदुकीचा धाक दाखवून महिलेसह गैरवर्तन करण्यात आले. महिलेने तक्रारीत जो घटनाक्रम सांगितला तो ऐकन पोलिसही चक्रावले. याप्रकरणी पोलिसांनी 5 जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

महालक्ष्मी परिसरात ही घटना घडली आहे. पीडित महिलेचे महालक्ष्मी परिसरात कार्यालय आहे. या कार्यालयातच 51 वर्षीय महिलेचा विनयभंग झाला आहे. या महिलेचे कपडे काढून तिला बंदुकीच्या धाकावर धमकावण्यात आले. महिलेने पोलिस तक्रारीत तिच्यावरील अत्याचाराचे वर्णन केले आहे. तिने पोलिसांना सांगितले की १७ जानेवारी २०२३ रोजी एका कॉर्पोरेट कार्यालयात तिच्यावर हल्ला करण्यात आला. बंदुकीच्या धाकावर तिला कपडे काढून तिला धमकावण्यात आले. आरोपी आणि इतर पाच जणांनी तिचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकीही दिली.

मुंबईतील महालक्ष्मी येथील महिलेने मुंबई पोलिसांना या भयानक घटनेची माहिती दिली आहे. पोलिसांनी लैंगिक छळ आणि संबंधित गुन्ह्यांशी संबंधित भारतीय दंड संहिता (कढउ) च्या कलमांखाली तसेच शस्त्रास्त्र कायदा आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. महिलेने सुरुवातीला पायधोनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती, जी नंतर एनएम जोशी मार्ग पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आली. एनएम जोशी मार्ग पोलिसांनी २ नोव्हेंबर रोजी एफआयआर नोंदवला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला फोटो-फ्रेम आणि गिफ्टिंग व्यवसायात गुंतलेली एक व्यावसायिक महिला आहे आणि महालक्ष्मी येथे राहते. आरोपीने तिच्यावर अत्याचार केला आणि तिचे व्हिडिओ रेकॉर्ड करण्याची आणि फोटो काढण्याची धमकी दिली, जी तिने सोशल मीडियावर व्हायरल करण्याची घोषणा केली. पोलिसांनी जॉय जॉन पास्कल पोस्टेलसह सहा जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली. पीडित महिलेने केलेल्या तक्रारीनुसार, आरोपी जॉय जॉन पास्कल पोस्टने ऑफिसमध्ये तिच्यासोबत गैरवर्तन केले. अश्लील चाळे करण्यात आले. थेट बंदकीचा धाक दाखवून तिला कपडे उतरवण्यास भाग पाडले. त्यांनतर आरोपीने महिलेला गलिच्छ शिवीगाळ करत तिचे नग्न अवस्थेतील व्हिडीओ फोटो काढले. तसेच तिने या या घटनेबद्दल आवाज उठवला, तर ते व्हिडिओ आणि फोटो व्हायरल करण्याची धमकीही दिली. यामुळे ती महिला हादरून गेली.

संभाजीनगरात चोरीसाठी अल्पवयीनचा वापर



छत्रपती संभाजीनगरे। , मुख्य बसस्थानकात गदीर्चा फायदा घेत दागिने, पॉकेट चोरीच्या घटना घडत आहेत. आता यासाठी चोरटे अल्पवयीन मुला-मुलींचा वापर करत असल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि.१) समोर आली आहे. अधिकारी आणि सुरक्षारक्षकांनी सतर्कता बाळगत एक मोबाईल चोरटा आणि दोन अल्पवयीन मुलींना पोलिसांच्या स्वाधीन केले. बसस्थानकात गदीर्चा फायदा घेत प्रवासी हेरणारे अनेक जण येथे फिरत असतात. सुरक्षारक्षक आणि अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे अनेक चोरट्यांना रंगेहाथ पकडून क्रांती चौक पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. वारंवार त्यांचे नाव पोलिसांत जात असल्याने या चोरट्यांनी आता अल्पवयीन मुला-मुलींना यात सहभागी करून घेतल्याची माहिती सोमवारी ताब्यात घेतलेल्या दोन अल्पवयीन मुलींमुळे समोर आली आहे. सोमवारी सकाळी एक मोबाईल चोरटा आणि दोन अल्पवयीन मुली सुरक्षारक्षक आणि अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. त्याची तपासणी केली असता, त्या मुलींकडे ब्लेड आढळून आल्या. चोरट्यांनी हा नवा फंडा काढल्याने यांचा म्होरक्या कोण आहे हे शोधून काढणे म्हत्वाचे आहे. अन्यथा बसस्थानकांवर येणाऱ्या दिवसांत चोर्यांचे प्रमाण वाढण्याची भिती प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

पोलीस पतीच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून पत्नीची आत्महत्या पतीसह सासरच्या तिघांविरोधात गुन्हा

मिरारोड। वसई-विरार पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या पोलिसाच्या पत्नीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक सय्यद जिलानी करत आहेत. त्या पोलीस पत्नीचं नाव स्वाती चाटे आहे.


स्वाती चाटे या मूळच्या बुलढाणा जिल्ह्यातील आहेत. २९ एप्रिल २०२५ रोजी प्रभू चाटे यांच्याशी आई-वडिलांच्या संगनमताने त्यांचा विवाह झाला. २०२३ मध्ये मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस भरतीमध्ये प्रभू चाटे पोलीस शिपाई म्हणून भरती झाला होता. लग्नानंतर मिरारोड येथील लक्ष्मी पार्क परिसरात भाड्याने खोली घेऊन ते राहत होते. लग्नाच्या आठव्या दिवशी प्रभू मद्यपान करून घरी आला होता. त्यावेळी स्वाती यांनी त्याला मद्यपान करू नका, हे मला आवडत नाही, अशी विनंती केली होती. मात्र प्रभू नेहमीच ड्युटी संपल्यावर दारू पिऊन घरी येत होता. त्यामुळे त्यांच्यात नेहमीच वाद होत होते.

प्रभू चाटे याचे भाऊ विष्णू चाटे यांची पत्नी वैशाली चाटे गर्भवती असल्याने मदतीसाठी स्वातीला पुण्याला पाठवण्यात आले होते. त्या ठिकाणी स्वातीवर संशय घेत तिची नणंद, सासू-सासरे मानसिक त्रास देत होते. हा वाद एवढा झाला होता की स्वाती आणि प्रभू यांच्या नातेवाईकांची या संदर्भात बैठक देखील झाली होती. त्यावेळी प्रभू याने यापुढे दारू न पिण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर २ नोव्हेंबर रोजी प्रभू स्वाती यांना पुण्यावरून मिरारोडला घेऊन आला. त्यानंतर देखील प्रभू याचे दारू पिणे काही बंद झाले नाही. एवढेच नाही तर आता तो स्वाती यांना मारहाण देखील करू लागला होता.

प्रभूची २७ नोव्हेंबरला साप्ताहिक सुट्टी होती. दुपारी २ वाजता प्रभू त्याच्या मित्रांसोबत दारू पीत बसला. स्वातीने फोन करून साप्ताहिक सुट्टी असतानी देखील आपण मला वेळ देत नाही, अशी तक्रार केली. यावरून दोघांचा फोनवरच वाद झाला. त्यानंतर स्वाती यांनी त्यांच्या आईला व्हिडिओ कॉल करून सुट्टीच्या दिवशी प्रभू मित्रांसोबत दारू पीत आहे, असे कळवले. या सर्व गोष्टीला प्रचंड कंटाळली असून याचा प्रचंड मानसिक त्रास होत आहे. त्यामुळे मी आत्महत्या करत असल्याचं, त्यांनी आईला सांगितले. यावेळी स्वातीच्या आईने प्रभू यांना कॉल करून विचारपूस केली असता ते दारू पीत असल्याचे दिसून आले. स्वाती यांच्या आईने प्रभूला तातडीने घरी जाण्यास सांगितले. प्रभू सायंकाळी घरी आल्यानंतर स्वातीने गळफास घेऊन लावून आत्महत्या केल्याचे दिसले. ही माहिती त्याने पोलिसांना दिल्यावर मिरारोड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले. लग्नानंतर सातव्या महिन्यात तिने आत्महत्या केली. स्वाती पुण्यातून बीएससीचे शेवटच्या वर्षाचा अभ्यास करत होती.

स्वाती यांच्या आत्महत्या प्रकरणी त्यांच्या आईच्या फिर्यादीवरून पती प्रभू चाटे (२७), सासू रंजना चाटे (५५), सासरे भगवान चाटे (६३) आणि नणंद पुष्पा सुभाष सानप (३०) यांच्या विरोधात आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा मिरारोड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई प्रभू चाटेला पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्याला ३ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.





लग्नसोहळ्यात मानानं मिरवावे ५ अस्सल मराठी दागिने

भारतीय लग्न म्हटलं की नटणं- मुरडणं आलंच. वऱ्हाडापासून नवरीपर्यंत, पोशाखापासून दागिन्यांपर्यंत प्रत्येक घटकात एक वेगळाच रॉयल टच दिसतो. साडीची निवड असो, मेकअप असो किंवा केसांची स्टाइल. सगळ्यात महत्त्वाची शोभा वाढवतात ती पारंपरिक दागिन्यांनी. जर आपल्याही घरी लग्न असेल तर काठाच्या आणि खणाच्या साडीवर कोणते पारंपरिक दागिने घालायला हवे जाणून घ्या.



मोहनमाळ

मोहनमाळ हा एक पारंपरिक मराठमोळा सोन्याचा दागिना आहे. सोन्याच्या तारेमध्ये जोडलेला गोल मण्यांमध्ये असतो. ही माळ एक, दोन, तीन किंवा त्याहून जास्त पदरांमध्ये असते.



कोल्हापूरी साज

महाराष्ट्रातील प्रसिद्ध आणि सगळ्यांचा आवडता दागिना कोल्हापुरी साज. पारंपरिक महाराष्ट्रीयन दागिना आहे.




चिंचपेटी

चिंचपेटी हा पारंपरिक दागिना आहे. गळ्याभोवती बसणारा घट्ट असा चोकर प्रकार. हा सोन्याच्या चिंचेच्या पानासारख्या पेट्या आणि मोत्यांनी बनवतात.



ठुशी

ठुशी ही गोल मण्यांच्या माळेने बनवली जाते. राजेशाही आणि मनमोहक लुक मिळतो. आता ठुशीच्या बांगड्या, मंगळसूत्र यांसारखे विविध प्रकार उपलब्ध आहेत.



नथ

नथ हा पारंपरिक दागिना आहे. जो स्त्रियांच्या सौंदर्यात भर घालतो. महाराष्ट्रात नथ हे सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. लग्न समारंभात किंवा सणासुदीला परिधान केली जाते.

ऑफिस वेअरसाठी पुढच्या गळ्याच्या ५ स्टायलिश ब्लाऊज डिझाइन्स



रोज ऑफिसला जाताना आज काय घालू असा प्रश्न प्रत्येकाला पडतो. डेली रुटीनमधला कन्फ्युजनचा भाग. आपल्या वॉडरोबमध्ये अनेक कपडे, साड्या असतात. पण कधी ब्लाऊज फिटिंग बसत नाही तर कधी मॅचिंग होत नाही. दरवेळी नवीन ब्लाऊज शिवणे देखील शक्य नसतं.

हिवाळा असला की आपल्या कपड्यांचे सिलेक्शन देखील वेगळे असते. आपण फुल हातांचे किंवा थंडी लागणार नाही असे कपडे निवडतो. या काळात स्टायलिश दिसणं थोडं आव्हानात्मक असते. पण या ५ पद्धतीचे फॅन्सी ब्लाऊज शिवल्यास तुमच्या सौंदर्यात भर पडेल.

स्टायलिश लूकसाठी आपण व्ही- नेकलाइन असलेला ब्लाऊज शिवू शकतात. यात फुल स्लीव्हज देखील शिवता येतील. जे आपल्याला लूकला अधिक आकर्षित करेल. जर आपल्याला सुंदर आणि शाही लूक हवा असेल तर आपण चुडीदार पद्धतीचे ब्लाऊज शिवू शकतो. हे दिसायला खूप सुंदर असते.

क्लासी लूकसाठी हॉल्टर नेकलाइन ब्लाऊज डिझाइन फार सुंदर आहे. यात खांद्यावर कटवर्क असतो. ज्यामुळे साधा ब्लाऊज्जदेखील छान दिसतो.

फुल स्लीव्हज नको असतील तर आणि पफ स्टाईल ब्लाऊज शिवू शकतो. हे दिसायला खूप फॅन्सी असतात. बलून स्लीव्हज खूप स्टायलिश असतात. त्यामुळे आपल्याला कम्फर्टेबल वाटते. आपली साडी शिफॉन किंवा जॉर्जेटची असेल तर स्टेटमेंट लूक मिळतो.



बुगडीऐवजी आला नीडल इअरकफचा नवा ट्रेंड

फॅशनच्या दुनियेत नेहमीच काहीतरी नवीन ट्रेंड येत असतो. पण पारंपरिकतेला मॉडर्न टच सोबत खास जोड देण्याची कला ही खूप कमी गोष्टींमध्ये दिसते. कानात बुगडी घालणे, हा आपल्या संस्कृतीचा आणि सौंदर्याचा अविभाज्य भाग आहे. बुगडीमुळे चेहऱ्याला एक वेगळीच शोभा येते आणि पारंपरिक लुक पूर्ण होतो.

बदलत्या काळानुसार, बुगडीला एक नवा, स्टायलिश आणि तरीही पारंपरिकतेचा फील देणारा पर्याय उपलब्ध झाला आहे, ते म्हणजे 'नीडल ईअररिंग कफ्स' आता बुगडीऐवजी नीडल ईअररिंग कफ घालण्याचा नवा ट्रेंड फारच लोकप्रिय होत आहे.

आकर्षक, यूनिक, हलके वजनाचे आणि कानाला वेगळेपण देणारे हे इअरकफ कोणत्याही एथनिक किंवा पारंपरिक लूकला एकदम रॉयल आणि मॉडर्न टच देतात.

नीडल ईअररिंग कफ्स हे कानातले डिझाईन्स बुगडीइतकेच सुंदर आणि आकर्षक दिसतात, पण त्यांची स्टाईल अधिक मॉडर्न आणि हटके असते. हे तुम्हाला पारंपरिकतेचा अनुभव देण्यासोबतच एक क्लासी आणि ट्रेंडी लुक देतात. आता जुन्या बुगड्यांच्या ऐवजी, तुम्ही या नीडल ईअररिंग कफसच्या मदतीने तुमच्या पारंपरिक पोषाखाला एक नवा आणि स्टायलिश ट्विस्ट देऊ शकता. हे कानातले डिझाईन्स तुमच्या सौंदर्यात भर टाकून तुम्हाला नक्कीच इतरांपेक्षा वेगळे आणि आकर्षक बनवतील.



लग्न, सण, पारंपरिक कार्यक्रम किंवा प्रत्येक खास प्रसंगासाठी नीडल ईअररिंग कफ हा एक परफेक्ट पर्याय आहे. त्यामुळे झुमके, बुगडी किंवा मोठम ोठे जड दागिने न घालता देखील तुम्ही सुंदर आणि ग्रेसफुल दिसू शकता. नीडल ईअररिंग कफ मोत्यांनी आणि चमकदार स्टोन्सनी सजवलेले असतात, जे तुम्हाला रॉयल आणि एलिगंट लुक देतात. पार्टीवेअर किंवा खास प्रसंगांसाठी हे उत्तम पर्याय आहेत.

मोरपंखी डिझाईन असलेले नीडल कफ पारंपरिक भारतीय अलंकारांना एक आधुनिक टच देतात. हे तुमच्या एथनिक लुकला चार चाँद लावतात. गोल्डन पारंपरिक डिझाईन्स असलेले हे क्लासिक नीडल कफ कोणत्याही पारंपरिक साडी किंवा लेहेंग्यावर खूप सुंदर दिसतात. यांची डिझाईन साधी पण आकर्षक असते.

जर तुम्हांला रंगीबेरंगी कुंदन वर्क आवडत असेल तर तुम्ही कुंदन वर्क असणारे ट्रेंडी नीडल एअरकफ एअररिंग घालू शकता.

नऊवारी साडीवर पारंपरिक मराठमोळा लूक हवा असेल तर आपण चंद्रकोर असलेले पारंपरिक नीडल एअरकफ नक्की घालून आपल्या लुकला एका खास रॉयल टच देऊ शकता.

पारंपरिक डिझाईन्समध्ये कलश, मोरपंखी अशा वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर, रेखीव डिझाईन्स पाहायला मिळतील.

कोणत्या साडीवर कोणता दागिना चांगला दिसतो? ५ टिप्स, साडीनुसार 'असा' ठरवा दागिना

एकच एक प्रकारचे दागिने तुम्ही सगळ्याच प्रकारच्या साड्यांवर घालत असाल तर त्यामुळे तुम्ही खूप साचेबद्ध दिसाल. शिवाय तुमची साडी, तुमचा लूक आणि दागिनेही उठून दिसणार नाहीत.

म्हणूनच नेहमीच साडीच्या प्रकारानुसार दागिन्यांची निवड करायला हवी. त्यासाठीच या काही टिप्स पाहा आणि साडीनुसार कोणते दागिने घालायचे ते ठरवा..

खण, कॉटन, लीनन या प्रकारातल्या साड्या असतील तर त्यावर ऑक्सिडाईज ज्वेलरी घाला.

सिल्क, सेमी सिल्क प्रकारातल्या साड्या असतील तर त्यावर सोन्याचे किंवा गोल्डन पॉलिशचे दागिने घाला.

जर तुमची साडी ऑर्गेंझा प्रकारातली असेल तर त्यावर खड्यांचे, स्टोनचे दागिने घाला.

प्लेन साडी असेल किंवा नाजुक डिझाईन असणारी फ्रेश, फिक्या रंगाची साडी असेल तर मोत्याचे दागिने छान दिसतील.

जर नऊवारी नेसणार असाल तर तिच्यावर हमखास सोन्याचे पारंपरिक दागिने घाला.





भारतीय महिलांना साड्या घालायला आवडतात. म्हणून, त्यांना त्यांच्या कपाटात भरपूर साड्या हव्या असतात, परंतु जसजशी साडी जुनी होऊ लागते तसतसे तिची चमक कमी होऊ लागते. जर तुमच्या साडीची चमक कमी झाली असेल, तर आज आपण तिची चमक टिकवून ठेवण्यासाठी काही टिप्स पाहणार आहोत.

साडीची चमक टिकवून ठेवण्यासाठी टिप्स -

जर साडीची चमक कमी होऊ लागली असेल, तर ती धुताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. जेव्हा साडी धुता तेव्हा थोड्या प्रम ाणात डिटर्जंट वापरा आणि नेहमी सौम्य डिटर्जंट वापरा. सौम्य द्रव किंवा सौम्य डिटर्जंट साडीला फिकट होण्यापासून रोखेल आणि ती पूर्णपणे स्वच्छ करेल.

साडीची चमक गेली आहे का? या टिप्स नक्कीच ट्राय करा

साडी थंड पाण्याने धुवा-

तसेच, साडी धुताना थंड पाण्याचा वापर करा. गरम पाण्यामुळे साडीची चमक कमी होऊ शकते. साडी वाळवताना, ती थेट सूर्यप्रकाशात येऊ देऊ नका. तीव्र सूर्यप्रकाशामुळे तिची चमक कमी होऊ शकते. म्हणून, साडी सावलीच्या ठिकाणी वाळवा.

तसेच, कपाटात नॅप्थालीन बॉल्स किंवा सिलिका जेल पॅकेट्स ठेवा. यामुळे साडीची चमक टिकून राहण्यास मदत होईल आणि दुर्गंधी देखील कमी होईल. नॅप्थालीन बॉल्स आणि सिलिका जेल पॅकेट्स विशेषतः रेशीम आणि रेशमी साड्यांचे संरक्षण करण्यास मदत करतील.

साडी इस्त्री करताना या गोष्टी लक्षात ठेवा

जेव्हा साडी धुवून वाळवाल आणि नंतर ती इस्त्री कराल तेव्हा विशेषतः काळजी घ्यावी लागेल. जर साडी रेशमी किंवा नाजूक कापडापासून बनलेली असेल, तर नेहमी कमी इस्त्री तापमान वापरा. साडी इस्त्री करताना कागदाचा देखील वापर करू शकता. साडी कागदावर ढाबल्याने तिची चमक कमी होणार नाही आणि कापड टिकून राहील.



१. केबल निट पॅटर्न : मोठ्या धाग्याने विणलेला पॅटर्न स्वेटर, कार्डिगन आणि स्कार्फसाठी खूप वापरला जातो. दिसायला क्लासिक, उबदार आणि भारी कपड्यांसारखा दिसतो.

२. रिब्ड निट पॅटर्न : रिब्ड निट पॅटर्न अंगाला फिट होणाऱ्या स्वेटर, टॉप आणि टर्टलनेकमध्ये दिसतात. हिवाळ्यात स्टायलिश तसेच आरामदायक पर्याय.

३. हेरिंगबोन पॅटर्न : कोट, ओव्हरकोट आणि जॅकेटमध्ये हा पॅटर्न दिसतो. थोडा शार्प, फॉर्मल आणि एलिगंट लूक देणारे डिझाईन आहे.

४. प्लेड / चेक्स पॅटर्न : शाल, जॅकेट, कोट आणि वूलन स्कर्टमध्ये सर्वात लोकप्रिय हा पॅटर्न असतो. विंटर फॅशनचे हे नेहमीचे आणि ट्रेंडी पॅटर्न आहेत.

५. हाउंडटूथ पॅटर्न : क्लासिक आणि स्टायलिश असा हा डिझाइन कोट, ब्लेझर आणि वूलन पँट्समध्ये आवडीने वापरला जातो.

६. फेअर आयल पॅटर्न : अनेक रंगांचे पारंपारिक निटिंग डिझाईन. ख्रिसमस स्वेटर, फुल-स्लीव्ह स्वेटर आणि कार्डिगनमध्ये खूप लोकप्रिय प्रकार असून दिसतातही सुंदर.

७. डायमंड आर्गाइल पॅटर्न : डायमंड आकाराचे जाळीसारखे डिझाईन पुलओव्हर, स्वेटर-वेस्ट आणि मोज्यांमध्ये मिळणारा हा पॅटर्न आहे.

८. वूलन एम्ब्रॉयडरी पॅटर्न : शाल, स्वेटर आणि कुर्ती-कोटांवर सूक्ष्म धाग्यांची भरतकाम केलेली स्टायलिश डिझाइन असते. पारंपारिक आणि मॉडर्न दोन्हीमध्ये दिसते.

थंडी स्पेशल सुपरस्टायलिश गर कपड्यांचे ८ ट्रेंडी प्रकार



महागड्या हँड बॅग्स खरेदी करताना ही खबरदारी घ्या

आजकाल ब्रँडेड कपड्यांच्या जोडीने ब्रँडेड ॲक्सेसरीजही वापरण्याबाबत महिला जास्त दक्ष होत आहेत. हातातली पर्स किंवा हँड बॅग, शूज पर्यंत सर्व काही एखाद्या प्रसिद्ध ब्रँडचेच वापरण्याकडे आजकाल वाढता कल दिसून येत आहे.

महिलांच्या बाबतीत म्हणायचे झाले, तर घराबाहेर पडताना आवर्जून बरोबर घेतली जाणारी वस्तू म्हणजे हँड बॅग, किंवा पर्स. हँड बॅग, हे आत केवळ पैसे किंवा इतर आवश्यक वस्तू ठेवण्याचे साधन राहिले नसून आता ते 'स्टाइल स्टेटमेन्ट' झाले आहे. म्हणूनच सुप्रसिद्ध देशी विदेशी ब्रँडस्च्या हँड बॅग्सना बाजारामधे मोठी मागणी आहे. पण एखादी महागडी हँड बॅग खरेदी करताना आपण 'डुप्लिकेट' बॅग तर खरेदी करत नाही ना, याबद्दल जागरूक असणे गरजेचे आहे. आजकाल बाजाराम ध्ये अनेक मोठमोठ्या ब्रँडस्ची नावे वापरून नकली माल विकला जात आहे. आपली फसवणूक होऊ नये याकरिता आपण खबरदारी घेणे आवश्यक आहे. आपण निवडलेली बॅग 'ओरिजीनल' आहे की 'फेक' आहे हे कळणे काहीसे कठीणच म्हणावे लागेल. पण ज्या व्यक्तीला हँड बॅग्सची चांगली माहिती आहे, त्याला हा फरक कळल्यावाचून राहणार नाही.



संपादकीय

सैरभैर होण्यामागचे कारण काय?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




निवडणूक आयोग सध्या काय करत आहे, असा प्रश्न रोज विचारला जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये रोज नवीन ट्विस्ट आणि अपडेट समोर येत आहेत. साधारण आठ वर्षानंतर होत असलेल्या या निवडणुकांमध्ये मतदान होईपर्यंत कुठेही विघ्न आले नाही, असा एकही दिवस गेला नाही. निवडणूक आयोग कोणाच्या ताटाखालचे मांजर झाले आहे, हे वाक्यही आता त्यांच्यासाठी वापरून वापरून गुळगुळीत झाले. दुसरीकडे, १२ राज्यांमध्ये विशेष पुनर्निरीक्षण (एसआयआर) सुरू करून आयोगाने बीएलओंना (घरोघरी जाऊन चाचपणी करणारे कर्मचारी) वेठीस धरले असल्याचा आरोप होत आहे. आयोगाच्या दबावामुळे आतापर्यंत २४ बीएलओंचा एक तर हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे किंवा कामाच्या दबावामुळे त्यांनी आत्महत्या केली. निवडणूक आयोगाने या बीएलओंच्या मृत्यूबद्दल ना ट्विट करत दुःख व्यक्त केले, ना त्यांना श्रद्धांजली वाहिली. मात्र कामातून ब्रेक घेऊन बीएलओ तणावमुक्तीसाठी डान्स करत असल्याचा व्हिडिओ आयोगाने ट्विट केला आहे. निवडणूक आयोगाने व्हिडिओ ट्विट केला म्हटल्याबरोबर तुम्हाला लागलीच आठवलं असेल की याच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटले होते की, 'आम्ही आमच्या आया-बहिणींचे व्हिडिओ सार्वजनिक केले पाहिजे का?' मतदान करतानाचे व्हिडिओ देण्यास यांचा नकार होता, मात्र महिला आणि पुरुष बीएलओ नाचताना तणावमुक्त होतात, असं व्हिडिओ सार्वजनिक करून हे सांगत आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग सैरभैर का झाला आहे, असा प्रश्न पडतो. महाराष्ट्रात तर राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकीचा जो चिखल करून ठेवला आहे, तो मतदान सुरू असतानाही सावरता आलेला नाही. मतदान सुरू असताना कोर्टाने निकालाची तारीख बदलली. निवडणूक आयोगाने केलेला चिखलच एक प्रकारे कोर्टाने त्यांच्यावरच फेकला. सुरुवातीला २७ टक्के ओबीसी आरक्षणाचा घोळ निवडणूक आयोगाने घातला. त्यामुळे ही निवडणूकच रद्द होण्याची नामुष्की येणार होती. सर्वोच्च न्यायालयाने एवढ्या वर्षापासून लांबलेल्या निवडणुका आता पुन्हा लांबणीवर टाकणे बरे नव्हे म्हणत आधी निवडणुका घ्या, आणि मग तुम्ही आरक्षणाच्या नावाने जो घोळ घातला आहे तो निस्तरा, असा सज्जड दमच दिला. या निवडणुका झाल्यानंतर जानेवारीमध्ये सर्वोच्च न्यायालय वाढलेले आरक्षण रद्द करणार आणि त्या ठिकाणी पुन्हा निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. ३ डिसेंबरला जाहीर होणारा नगर परिषद, नगरपंचायतींचा निकाल आता २१ डिसेंबरपर्यंत पुढे गेला आहे. यावर सत्ताधारी आणि विरोधक दोघेही राज्य निवडणूक आयोगावर खवळले आहेत. 'यांची कुठली तरी सेटिंग राहिली असेल, म्हणून निकाल पुढे ढकलले', असे म्हणत सत्ताधारी पक्षाचे निलेश राणे यांनी सर्वसामान्य जनतेच्या मनातील प्रतिक्रिया व्यक्त केली. निलेश राणे यांनी या निवडणुकीत ज्या पद्धतीने निवडणूक अधिकारी, पोलीस आणि भारतीय जनता पक्षाचा बुरखा फाडला आहे, त्यासाठी त्यांचे कौतुकच केले पाहिजे. सत्ता प्रशासनाला कशी वाकवते हे राणेंनी स्टिंग ऑपरेशन करून उघड केले. मालवणमध्ये त्यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यांना २५ लाख रुपयांसोबत रंगेहात पकडून दिले तरीही त्यांच्यावर निवडणूक अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही, उलट पोलिसांनी निलेश राणेंवरच गुन्हा दाखल केला. आज झालेल्या मतदानावेळीचे राज्यातील जे चित्र समोर आले त्यावरून आपण २१ व्या शतकात राहत आहोत की महाराष्ट्रातील प्रत्येक गावागावात चंबळचे डाकू राहतात, असा सवाल निर्माण होत आहे. राज्यातील एकही गाव आणि नगर परिषद, नगरपंचायत अशी राहिली नाही की तिथे हाणामारी झाली नाही. चांद्यापासून बांद्यापर्यंत सर्वत्र बोगस मतदारांचा सुळसुळाट दिसला. शिंदेंचे दोन आमदार तर स्वतःच निवडणूक आचारसंहितेच्या चिंधड्या उडवताना दिसले. आमदार बांगर हे थेट मतदान केंद्रात महिलेला कोणतं बटण दाबायचे याचे 'मार्गदर्शन' करताना दिसले. तिथे उपस्थित असलेल्या निवडणूक कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर तात्काळ कोणतीही कारवाई केली नाही. जेव्हा मुख्यमंत्री फडणवीसांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली, त्यानंतर आयोग जागा झाला आणि कारवाईस सुरुवात केली. संजय गायकवाड यांच्या दिवट्याने लोकांच्या तावडीत सापडलेल्या बोगस मतदाराला पोलिसांकडून सोडवून पळवून लावल्याचे महाराष्ट्राने पाहिले. एकीकडे आयोगाने प्रचारासाठी एक दिवस वाढवून देण्याचा नवा पायंडा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी घालून दिला. त्यामुळे गुलाबराव पाटलांनी म्हटल्याप्रमाणे रात्रभर लक्ष्मीदर्शनाचा योग सरकारमान्य करण्याचे काम आयोगाने केले. त्यासोबतच अचानक निवडणुकीच्या दोन दिवस आधी २४ नगर परिषदांच्या निवडणुका रद्द करून मोठा गोंधळ आयोगाने घातला. त्यांच्या या निर्णयावर मुख्यमंत्र्यांपासून विरोधी पक्षातील नेत्यांनीही संताप व्यक्त केला. निवडणूक आयोग स्वायत्त आहे, पण खरंच एवढा स्वायत्त आहे का, की तो निवडणुकाच रद्द करू शकेल? या निर्णयामुळे जो गोंधळ निर्माण झाला त्याने संपूर्ण यंत्रणाच वेठीस धरली गेली आहे. एक काळ मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांचा होता, ज्यांनी निवडणुकीला शिस्त लावली. मात्र आता शेषन हे जणूकाही पन्नास वर्षांपूर्वी होऊन गेले की काय, असा कारभार केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयोगाचा सुरू आहे. असा गोंधळ पुढील निवडणुकीत घालू नका, असे औरंगाबाद खंडपीठाला ठणकावून सांगावे लागले आहे. अजून महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका बाकी आहेत, तेव्हा तरी हा भोंगळ कारभार चालू नये, एवढी अपेक्षा सामान्य मतदारांची आहे.

मतदार जागृती हवी



भारतीय संविधानाचे कलम ३२६ मध्ये सुधारणा करून २१ वर्षांवरून १८ वर्ष पूर्ण झालेल्या नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे. तेव्हा देशातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याही नागरिकाला मतदान करता येणार आहे. हा भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला दिलेला मूलभूत अधिकार असून याची जाणीव मतदारांना निवडणुकांपूर्वी करून देणे गरजेचे असते. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव विविध कार्यक्रमांनी देशात साजरा करण्यात आला. मात्र मागील ७५ वर्षांत भारतीय संविधानाबाबत जागरूकता व्हायला पाहिजे होती ती झालेली दिसत नाही. त्यामुळे लोकांचे घटनात्मक अधिकार व त्यांच्या कर्तव्यांबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी 'घर घर संविधान' या कार्यक्रम २६ जानेवारी २०२६ पर्यंत आपल्या राज्यात राबविला जात आहे. महाराष्ट्र राज्यात २४७ नगर परिषदांपैकी २४६ नगर परिषदांसाठी निवडणुका होत आहेत. यामध्ये १० नव्याने स्थापन झालेल्या नगर परिषदा असून २३६ नगर परिषदांची मुदत संपली आहे, तर राज्यातील १४७ नगरपंचायतींपैकी ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. यात १५ नवनिर्मित नगरपंचायतींचा समावेश आहे. मतदाराला आपले अमुल्य असे एक मत नगरपंचायतींच्या सभासदासाठी व एक मत नगराध्यक्षांसाठी अशी दोन मते देता येणार आहेत. नगर परिषदेमध्ये तीन ते चार मते देता येणार आहेत. राज्यातील नगर परिषदा व नगरपंचायत यांच्या भविष्याचा विचार करून निःपक्षपातीपणे काम करणारे लोकप्रतिनिधी निवडून दिले पाहिजेत. जेणेकरून ते आपल्या कारकिर्दीत चांगल्याप्रकारे काम करतील. राज्यात २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत १३,३५५ मतदार केंद्रांवर मतदान होणार आहे. जरी मतदान रात्री ९ वाजेपर्यंत चालले तरी मतदार राजाने ५.३० नंतर येऊन चालणार नाही. नगर परिषदा व नगरपंचायत निवडणुकीसाठी १ कोटी ७ लाख ३३५५ एकूण मतदार आहेत. यामध्ये ५३ लाख ७९ हजार ९३१ पुरुष मतदार, ५३ लाख २२ हजार ८७० महिला मतदार आणि ७७५ इतर मतदार आहेत. यासाठी मतदार राजाला जागृत करणे गरजेचे आहे. सध्या राज्यात नगर परिषदा व नगरपंचायत निवडणुकांचा प्रचार जोरात सुरू आहे. प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या पक्षाचा उमेदवार निवडून आल्यावर काय करणार आहे त्याचा जाहीरनामा मतदार राजाला जाहीररीत्या सांगत आहे. तर उमेदवार एकमेकांवर दोष-प्रत्यारोप करताना दिसत आहेत. यामुळे काही वेळा मतदार राजा संभ्रमात पडतो. अशावेळी राज्यातील मतदार राजाला जागृत केले पाहिजे. त्याप्रमाणे राज्य निवडणूक आयोग मतदार जागृती अभियान राबवीत असतात. मतदानादिवशी मतदान केंद्रावर मतदार राजाला मतदान करण्यासाठी मतदार ओळखपत्र किंवा मतदार स्लीप त्यांच्याकडे असणे आवश्यक आहे. आपल्या देशात लोकशाही व्यवस्थेत दर पाच वर्षांनी निवडणुका होत असतात. राज्यात आतापर्यंत एकाही केंद्रात १०० टक्के मतदान झालेले नाही. काही ठिकाणी टक्केवारी वाढलेली दिसत आहे. मात्र राज्याच्या हितासाठी त्याहीपेक्षा जास्त मतदारांची टक्केवारी वाढणे गरजेचे आहे. यातूनच चांगले प्रतिनिधी मिळू शकतात. यासाठी मतदारांची नाराजी लोकप्रतिनिधींनी दूर करणे आवश्यक आहे. फोडाफोडी, जोडाजोडी आणि वस्त्रहरण या पलीकडे काही लोकप्रतिनिधी सोडले, तर काहीच करीत नाहीत. यात विकास निधी बाजूला राहतो. आमच्यात या, विकास निधी कमी पडायला देणार नाही, यात पाच वर्षे केव्हाच निघून जातात. यामुळे विकासाकडे दुर्लक्ष होतो. त्यामुळे उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे यापेक्षा निवडून आल्यावर सामान्य माणसांना न्याय मिळेल काय, याचा विचार करून मतदार राजाने बिनधास्तपणे मतदानादिवशी मतदान करणे गरजेचे असते. कारण मतदारच नवीन सरकार सत्तेवर आणू शकतात किंवा पाडू शकतात. इतकी ताकद एका मतात आहे. तेव्हा निवडणुकीत मतदारांची आकडेवारी वाढणे आवश्यक आहे. यासाठी मतदार जागृती होणे गरजेचे आहे. आजही अनेक मतदार मतदान करीत नाहीत. त्यामुळे चुकीचे लोकप्रतिनिधी निवडले जातात. याचा परिणाम विकास योग्य पद्धतीने होत नाही. त्यासाठी जास्तीतजास्त मतदारांनी मतदान करायला हवे म्हणजे योग्य प्रतिनिधी निवडला जाईल. आपल्या देशात लोकशाही असल्याने मतदाराला अतिशय महत्त्व आहे. मतदारामुळे आपण योग्य प्रतिनिधी निवडू शकतो. याचा परिणाम सर्वसाधारण नागरिकांचे कल्याण होण्याला मदत होते. तेव्हा मतदार राजांनी आपले मतदान करून मतदानाचे मूलभूत कर्तव्य बजावावे. मतदार हा लोकशाहीचा पाया आहे. मात्र अजून अनेक लोक मतदानाचे महत्त्व पटवून घेत नाहीत. त्यासाठी मतदार जागृती जास्त महत्त्वाची असते. मतदानादिवशी काही लोक घरी राहणे पसंत करतात. नाव नोंदणी करीत नाहीत. सध्या तरुण वर्ग व ज्येष्ठ लाडक्या बहिणी यांच्यात उदासीनता दिसून येते. तेव्हा शाळा, महाविद्यालये, समाज माध्यमे, प्रसार मोहिमा, रॅली, पोस्टर व व्याख्याने इत्यादींच्या माध्यमातून मतदार जागृती करावी. मतदानामुळे आपल्या देशातील लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदारांनी मतदान केले पाहिजे. तेव्हा आपल्या विकासाच्या भवितव्यासाठी मतदार जागृती खूप महत्त्वाची असते. महाराष्ट्र राज्यातील नगर परिषदा व नगरपंचायतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि आपल्या देशातील लोकशाही मजबूत करण्यासाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान करूया. यासाठी मतदार जागृती अतिशय महत्त्वाची आहे.



आनंदाचा झरा

ध्यान मंदिरातील एकांत संपवून गुरुदेव प्रार्थना मंदिरात आले. गुरुदेव आसनस्थ झाले. नवीन पाहुण्या स्त्रीकडे पाहून गुरुदेवांनी मंद स्मित केलं. पाहुणी स्त्री थोडी पुढे सरकली. हात जोडून म्हणाली, 'म... मला एक प्रश्न अनेक वर्ष सतावतो आहे. कृपया मला सांगा. मला मार्गदर्शन करा'. गुरुदेवांनी होकारात्मक मान हलवली. पाहुण्या स्त्रीला बोलताना त्रास होत होता. ती कसाबसा आवंढा गिळत म्हणाली, ह्यमी अनेक संत आणि महात्म्यांच्या पोथ्या वाचल्या आहेत. काही पोथ्यांची तर अनेकवेळा पारायणं केली आहेत. नामस्मरण तर केलं आहेच, पण नाम आणि मंत्र लिहून माज्या अनेक वह्या भरल्या आहेत. पण तरी मला एक गोष्ट समजत नाही.' तिने एकवार गुरुदेवांकडे पाहिलं. आपलं पुढचं बोलणं ऐकायला ते उत्सुक आहेत का? याचा अंदाज घेतला.

गुरुदेव शांतच होते. 'मी कधीच कुणाचं वाईट चिंतलं नाही, की कुणाचं काही वाईट केलं नाही. दानधर्म केला. उपास केले. मग... माझं का वाईट झालं?' पदराला डोळे टिपत पाहुण्या स्त्री बोलायच्या थांबल्या. गुरुदेवांनी अत्यंत स्नेहार्द आवाजात विचारलं, 'काय झालं?' 'गेली सात वर्षं मी एका दुर्धर रोगानं आजारी आहे. दिवसेंदिवस मी खंगत चालले आहे. देवाचं इतकं सारं करून मला कृपाप्रसाद का नाही मिळत?' यावर गुरुदेव काहीच बोलत नाहीत हे पाहून ती पाहुणी स्त्री संतापली आणि म्हणाली, 'एकच प्रश्न विचारते. गावंढळ, अडाणी माणसांना न मागताही सदगुरूंचा कृपाप्रसाद मिळतो. त्यांचे आजार, त्यांची दुःख दूर होतात. मग माझ्यासारख्या व्रतवैकल्य करणारीवर अन्याय का होतो? सांगा गुरुदेव.' मंद स्मित करून गुरुदेव म्हणाले, 'हे माते, तुझ्या प्रश्नातच तुझे उत्तर आहे.'

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

२रा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे - ४०१ १०७, दुरध्वनी - २८१०३४०९.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उद्यान/१०२९/२०२५-२६ **दिनांक : ०५/१२/२०२५**

// जाहिर नोटीस //

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय येथे वर्टिकल गार्डन तयार करणेकामी दरपत्रक मागविणेकामी चालु जिल्हा दरसुचीमध्ये दर उपलब्ध नसल्यामुळे खुल्या बाजारातुन दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर कामाची दरसुची महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरून Download करुन दि. १०/१२/२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका, उद्यान विभाग, २ रा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन, जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व) येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरून बंद लिफाफ्यामध्ये देण्यात यावेत.

जा.क्र.मनपा / मावज/जाहि./ई -७८१०५८८/२०२५-२६
दिनांक ०८/१२/२०२५

(कविता बोरकर)
उप आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार,०९ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२५

प्रचाराच्या अंतिम टप्प्यात परंड्यात 'अंधश्रद्धे'चा प्रवेश

विकासाच्या मुद्द्याऐवजी भीतीचं वातावरण

परंडा नगरपरिषदेच्या निवडणुकीत यंदा शिवसेना (शिंदे गट) आणि जनशक्ती नगरविकास आघाडी यांच्यात थेट लढत आहे. दोन्ही पक्षांकडून गेल्या काही दिवसांपासून विकासाच्या मुद्द्यांवर जोरदार प्रचार सुरू होता. मात्र, आत जादूटोण्याचा हा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने परंडा शहरात संपूर्ण वातावरण भीतीदायक व गंभीर बनले आहे. नागरिक दहशतीखाली आहेत. हे नेमकं कोणी केलं याचा शोध घेण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.



मुंबई। राज्यात सध्या नगरपरिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून प्राचार अंतिम टप्प्यात आला आहे. परंडा नगरपरिषदेच्या निवडणुकीचा प्रचारही शेवटच्या टप्प्यात असचानाच तिथे जादूटोण्याचा एक अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. शहरातील खाँजा खलील दर्गाह कब्रस्तानात जनशक्ती नगरविकास आघाडीच्या प्रमुख उमेदवारांच्या छायाचित्रांचा वापर करून जादूटोणा करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मोठी खळबळ माजली असून सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे.

निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीत, मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते रात्री उशिरापर्यंत बैठका घेतात, कॉर्नर सभा घेऊन भेटीगाठी करत असताता. मात्र हे सर्व प्रयत्न सुरू असतानाच आता, दुसरीकडे अंधश्रद्धेचा आधार घेतल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. पण हा सर्व प्रकार कोणी केला, त्यामागचा उद्देश काय आहे, हे तर अद्याप स्पष्ट झालेलं नाही, कोणातं नावही अजून समोर आलेलं नाही.

जादूटोण्यात कोण होतं टार्गेट?

मिळालेल्या माहितीनुसार, जनशक्ती नगरविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विश्वजित ज्ञानेश्वर पाटील, २० नगरसेवक, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, रणजित ज्ञानेश्वर पाटील, माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दीवाल, ॲड. नुरोद्दीन चौधरी, जमील पठाण, ॲड. जहीर चौधरी या सर्व प्रमुख नेत्यांचे आणि उमेदवारांच्या फोटोला सुया, दाभण टोचून ठेवण्यात आलं होतं. तसेच ते काळ्या कपड्यांमध्ये बांधून खाँजा खलील दर्गाह कब्रस्तानात ठेवले होते. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. त्यामुळे गावात मोठी खळबळ माजली असून भीतीचेही वातवरण आहे.

बुलढाण्याचे आमदारांच्या मुलाने पोलिसांशी हुज्जत घालून बोगस मतदाराला पळवून लावले

नगरपरिषद-नगरपंचायत निवडणुकांचा निकाल उद्या लागणार नाही

राज्यात आज बहुतांश ठिकाणी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी मतदान होत असून या निवडणुकांचा निकाल उद्या जाहीर होणार होता. मात्र काही नगरपरिषदांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने आता निवडणूक निकालही पुढे ढकलण्याचा निर्णय मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाकडून देण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा कोर्टात अपील प्रलंबित असलेल्या किंवा नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी पुरेसा वेळ न मिळालेल्या ठिकाणी निवडणुका 20 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकांसाठी मतदान झाल्यानंतर 21 डिसेंबर रोजी मतदान झालेल्या सर्व नगरपरिषद-नगरपंचायतींचे निकाल जाहीर होतील.



बुलढाणा। स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची रणधुमाळी महाराष्ट्रात पाहायला मिळत असतानाच बोगस मतदारांमुळे लोकशाहीचा सोहळा म्हणून पाहिल्या जाणाऱ्या या निवडणुकांकडे पाहण्याचा अनेकांचा दृष्टीकोन बदलत आहे. स्थानिक पातळीवरील राजकारणाला दिशा देणाऱ्या या निवडणुकीमध्ये बुलढाण्यातून असाच एक धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे.बोगस मतदार पकडल्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचा मुलगा कुणाल गायकवाड याने मध्यस्ती केली. पकडलेल्या शिवसेना कार्यकत्यार्ला पळून जाण्यास मदत केली. उपस्थित पोलिसाला देखील शिवीगाळ आणि दमदाटी करताना तसेच बोगस मतदाराचा बचाव करताना कुणाल गायकवाड व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहेत. आमदार पुत्रावर सरकारी कामकाजात अडथळा आणल्या प्रकरणी तसेच बोगस मतदाराला पळून जाण्यास मदत केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

'बुलढाण्यात शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी ग्रामीण भागातून लोकांना आणून नगरपालिका निवडणुकीत बोगस मतदान करून घेत आहेत. काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्ते या बोगस मतदारांना पकडून पोलिसांच्या हवाली करत असताना आमदार संजय गायकवाड यांचे पुत्र कुणाल गायकवाड यांनी पोलिसाला शिवीगाळ आणि दमदाटी करून बोगस मतदाराला पळवून लावले. या प्रकरणी कुणाल गायकवाड यांच्याविरोधात बोगस मतदान आणि सरकारी कामात अडथळा आपल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक केली पाहिजे, अशी मागणी देखील काँग्रेसकडून करण्यात आली आहे.

मतदानाच्या पार्श्वभूमीवर भानामती!

पुरोगामी महाराष्ट्रात रस्त्यावर ठिकठिकाणी भंडारा, लिंबू टाकल्याचा प्रकार

सांगली। महाराष्ट्रात धडाडीच्या नेतेमंडळींनी प्रचारात सहभाग घेतल्यानंतर आता नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठीच्या मतदान प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. याचदरम्यान काही अनपेक्षित वृत्तसुद्धा समोर आली आहेत. असंच एक वृत्त आहे पुरोगामी महाराष्ट्राच्या अशा भागातून जिथं राजकीय घडामोडी आणि मतदानाच्या पार्श्वभूमीवर भानामतीचा प्रकार घडला आहे. दरम्यान, सांगली जिल्ह्यातील सहा नगरपरिषदांपैकी दोन नगरपंचायतीसाठी मंगळवारी मतदान पार पडत असून, आठ नगराध्यक्ष पदांसाठी ४१ उमेदवार तर १८० नगरसेवक पदाच्या जागेसाठी ५९० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. आज पार पडणाऱ्या मतदानासाठी २ लाख ५८ हजार मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार असून आठ नगर परिषद आणि नगरपंचायतीसाठी आता प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात झाली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी २९१ ठिकाणी मतदान केंद्र नियुक्त करण्यात आली असून जवळपास १ हजार ७८० कर्मचारी यासाठी तैनात करण्यात आले आहेत.

त्याचबरोबर पोलीस बंदोबस्त देखील मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी तैनात करण्यात आला आहे. प्रामुख्याने ईश्वरपूर, तासगाव आणि जत नगरपरिषद ही संवेदनशील ठिकाण मानले जातात. आष्टा, विटा, पलूस शिराळा आणि आटपाडी नगरपंचायतीसाठी मतदान होणार आहे.



रस्त्यावर ठिकठिकाणी भंडारा आणि लिंबू

सांगलीच्या आष्टा नगरपरिषदेची निवडणूक पार पडत असतानाच या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक विचित्र घटना घडली. जिथं आष्टा शहरामध्ये भानामतीचा प्रकार समोर आला आहे. शहरात ठिकठिकाणी भंडारा आणि लिंबू टाकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला असून, मतदानाच्या अवघ्या काही तासांपूर्वी शहरातल्या अनेक भागांमध्ये रस्त्यावर भंडारा आणि लिंबू टाकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एका उमेदवाराकडूनच हा प्रकार करण्यात आल्याची चर्चा आष्टा शहरामध्ये सुरू आहे, ज्यामुळं मतदानापूर्वी अशा पद्धतीने करण्यात आलेल्या घटनेनं आष्टा शहरात खळबळ उडाली आहे.

राज्यात २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी झाले मतदान

कोणत्या जिल्ह्यात किती टक्के मतदान?

मुंबई। राज्यातील २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी मंगळवारी (२ डिसेंबर) मतदान पार पडले. राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या २६४ अध्यक्षपदांच्या आणि ६ हजार ४२ सदस्यपदांच्या जागांसाठी मतदारांचा कौल मतपेटीत कैद झाला आहे. दरम्यान, मुंबई हायकोर्टाच्या नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाने मतमोजणी २१ डिसेंबरला करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे ३ डिसेंबर होणारी मतमोजणी लांबणीवर पडली आहे.



- **पुणे :** पुणे जिल्ह्यात १२ नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायती आहेत. जिल्ह्यातील मंचर, माळेगाव, जेजुरी, वडगाव, सासवड, दौंड, इंदापूर, जुन्नर, तळेगाव दाभाडे, भोर, चाकण, आळंदी, राजगुरूनगर, लोणावळा, शिरूर या सर्व जागांसाठी अंदाजे ६८.०१% एवढे मतदान झाले आहे. प्रशासनाकडून अंतिम आकडेवारी जाहीर झाली नसल्यामुळे अंदाजे आकडेवारी सांगण्यात आली आहे.
- **कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात जयसिंगपूर, मुरगूड, मलकापूर, वडगाव, गडहिंग्लज, कागल, पन्हाळा, कुरुंदवाड, हुपरी, शिरोळ या नगरपरिषदेसाठी तर आजरा, चंदगड, हातकणंगले या नगरपंचायतीसाठी असे एकूण ७८.८७% मतदान झाले. ज्यात जिल्ह्यातील मुरगुड नगरपालिकेसाठी सर्वाधिक ८८.४३% मतदान तर जयसिंगपूर नगरपंचायतीसाठी सर्वात कमी ७०.२०% मतदान झाले.
- **सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट, दूधनी, मैंदर्गी, बार्शी, मोहोळ, अकलूज, कुडुर्वाडी, पंढरपूर, करमाळा, सांगोला या नगरपालिकांसाठी एकूण ६७. १०% मतदान झाले.
- **जळगाव :** जळगाव जिल्ह्यात जामनेर, भुसावळ, यावल, फैजपूर, पाचोरा, वरण गाव, अमळनेर, चाळीसगाव, सावदा, चोपडा, भडगाव, रावेर, धरणगाव, एरंडोल, पारोळा, नशिराबाद, मुक्ताईनगर, शेंदुर्णी या जागांवर नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी एकूण ६५.५६% मतदान झाले आहे.
- **सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण चार नगरपालिका आहेत. ज्यात मालवण, वेंगुर्ले, सावंतवाडी, कणकवली यांचा समावेश आहे. या चार नगरपालिकांसाठी एकूण ७४.३५% मतदान झाले आहे.
- **नाशिक :** नाशिक जिल्ह्यात एकूण ११ नगरपरिषदांसाठी ६८.३४% मतदान झाले आहे. ज्यात पिंपळगाव, मनमाड, भगूर, नांदगाव, सिन्नर, सटाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, ओझर, चांदवड, येवला या नगरपरिषदांचा समावेश आहे.
- **अमरावती :** अमरावती जिल्ह्यातही एकूण ११ नगरपालिका आणि नगरपंचायती आहेत. ज्यात अचलपूर, वरुड, दयार्पूर, मोर्शी, चिखलदरा, शेंदूरजना घाट, चांदूर रेल्वे, चांदूरबाजार, धामणगाव रेल्वे, धारणी, नांदगाव खंडेश्वर या नगरपंचायतींसाठी ६८.३८ टक्के मतदान झाले.
- **बुलढाणा :** बुलढाण्यामध्ये चिखली, खामगाव, मलकापूर, मेहकर, शेगाव, सिंदखेड राजा, लोणार, नांदुरा, जळगाव जामोद या १० नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी एकूण ६९.४२% मतदान झाले.
- **यवतमाळ :** जिल्ह्यातील आर्णी, घाटंजी, वणी, दिग्रस, उमरखेड, पुसद, दारव्हा, पांढरकवडा, नेर या नगरपरिषदा आणि ढाणकी या नगरपंचायतीसाठी ६७.८४% मतदान झाले.
- **अकोला :** अकोला जिल्ह्यात एकूण ४ नगर परिषदा व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान झाले. ज्यात हिवरखेड, तेल्हारा, मूर्तिजापूर, अकोट या नगरपालिका आणि बाशीर्टाकळी या नगरपंचायतीचा समावेश आहे.
- **गोंदिया :** गोंदियामध्ये ६२.८०% एकूण मतदान झाले आहे. तिरोडा, गोरेगांव, सालेकसा या जागांसाठी मतदान झाले आहे.


घोडबंदर रोड बनतोय आरोग्यविघातक

ठाणे : ठाणे महापालिका हद्दीत कापूरबावडी ते गायमुख या परिसरातील घोडबंदर रोडवर सध्या मेट्रो प्रकल्प, मुख्य रस्ता व सेवा रस्त्यांचे विलीनीकरण, पाणीपुरवठ्यासाठी जलवाहिनी टाकणे तसेच मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली इमारत बांधकामांमुळे ठिकठिकाणी खोदकाम झाले आहे. या खोदकामामुळे निर्माण झालेली माती, धूळ आणि सतत होणारे धुलीकरण यामुळे परिसरातील हवा अत्यंत धोकादायक व आरोग्यविघातक बनली आहे. या परिस्थितीवर तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माजी उपमहापौर नरेश मणेरा यांनी ठाणे महापालिका आयुक्त डॉ. सौरभ राव यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे. मणेरा यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाच्या अक्षम्य हलगर्जीपणा आणि निष्क्रियतेमुळे घोडबंदर रोड विभागातील नागरिक, आबालवृद्ध तसेच या भागातून प्रवास करणारे इतर नागरिक धोकादायक हवा प्रदूषणामुळे श्वसनविकार, डोळ्यांचे विकार आणि इतर आरोग्य समस्यांनी त्रस्त झालेले आहेत. प्रदूषण नियंत्रण विभागाने पूर्वीच नियमावली तयार करून उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची तरतूद केली असताना, प्रत्यक्षात मात्र कोणतीही कारवाई होत नसल्याने परिस्थिती गंभीर झाली असल्याचे त्यांनी नमूद केले.

हवेच्या गुणवत्तेसाठी महापालिका सज्ज

ठाणे, मीरा-भाईंदर आणि नवी मुंबईत धूळ नियंत्रण मोहीम गतिमान







ठाणे, हिवाळ्यात वाढलेल्या वायू प्रदूषणामुळे ठाणे, मीरा-भाईंदर आणि नवी मुंबई या तिन्ही शहरांमध्ये हवा गुणवत्ता झपाट्याने खालावत आहे. मीरा-भाईंदर आणि नवी मुंबई महापालिकांनी धूळ नियंत्रणासाठी फवारणी, स्वच्छता मोहीमा आणि बांधकामांवरील कडक कारवाई गतीमान केली असतानाच, ठाण्यातील घोडबंदर रोडवर धोकादायक पातळीचे प्रदूषण नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण करत असल्याची गंभीर नोंद माजी उपमहापौर नरेश मणेरा यांनी घेतली आहे.

रस्ते खोदकाम, मेट्रो प्रकल्प आणि अनियंत्रित बांधकामांमुळे निर्माण झालेल्या धूळकणांवर तात्काळ आणि कठोर उपाययोजना कराव्या, अशी त्यांनी ठाणे महापालिका आयुक्तांकडे मागणी केली आहे.

नवी मुंबई महापालिकेचे काटेकोर नियोजन

नवी मुंबई : हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन युद्धपातळीवर कामाला लागले आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निदेर्शानुसार मागील आठवड्यापासून सुरू झालेल्या स्वच्छता आणि प्रदूषण नियंत्रण मोहिमांनी गती घेतली असून त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून शहरातील अदकमध्ये सुधारणा दिसून येत आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या अखत्यारित शहरात सखोल स्वच्छता मोहिमा सातत्याने राबविण्यात येत आहेत. तुर्भे एमआयडीसीमधील गुडविल कन्स्ट्रक्शन साइटवर झालेल्या मोहिमेत ब्रश झाडूंनी रस्ते व परिसराची स्वच्छता करण्यात आली त्याचबरोबर जमा झालेली माती त्वरित गोळा करून जेट स्प्रे वाहनाने प्रक्रियाकृत पाण्याची फवारणी देखील करण्यात आली. याप्रकरणी संबंधित व्यावसायिकाकडून दंडाची वसुली अशा सर्वांगीण पद्धतीने धूळ नियंत्रणाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबईत विविध विकासकामांमुळे प्रदूषणात वाढ झाली आहे. एठउअढ च्या डस्ट सप्रेसर (फॉगर्स) द्वारे हवेत पाण्याचे सूक्ष्म फवारे सोडून धूळ खाली बसवणे ही मोहीम नियमितपणे सुरू आहे.

RMC प्रकल्पांवर करडी नजर

शहरातील प्रदूषणात सर्वाधिक वाटा विकासकामांदरम्यान निर्माण होणाऱ्या धुळीचा असल्याने, महापालिकेने विभागनिहाय पथके तयार करून ८६ बांधकाम साइट्सची पाहणी केली आहे. या ठिकाणी मानक कार्यपद्धती पाळली जात नसल्याने नोटिसा देण्यात आल्या असून पुढील पाहणीत त्रुटी कायम राहिल्यास दंडात्मक कारवाई, त्या साइटवरील काम आठवडाभर बंद अशी कठोर भूमिका प्रशासनाने घेतली आहे.

मीरा-भाईंदर शहरात डस्ट कंट्रोल यंत्रामार्फत धूळ नियंत्रण

भाईंदर : मीरा-भाईंदर शहरातील वाढत्या धूळकणांच्या प्रमाणावर नियंत्रण आणण्यासाठी महानगरपालिकाकडून डस्ट कंट्रोल यंत्रामार्फत पाण्याची फवारणी सुरू करण्यात आली आहे. शहरातील पर्यावरणास सुरक्षित ठेवत नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या निदेर्शानुसार डस्ट कंट्रोल यंत्रणेचा वापर करून नियमितपणे पाण्याची फवारणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे रस्त्यावरील धूळकणांचे प्रमाण कमी होऊन हवेची गुणवत्ता सुधारण्यास मोठी मदत होत असल्याचा पालिकेचा दावा आहे. शहरातील प्रमुख मार्गांवर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फाऊंटन ते गायमुख परिसरात डस्ट कंट्रोल मशीनच्या सहाय्याने पाण्याची व्यापक फवारणी करण्यात आली. प्रभाग समिती क्रमांक ३, ४, ५ आणि ६ च्या कार्यक्षेत्रातही डस्ट कंट्रोल यंत्रणेचा वापर करून पाण्याची फवारणी करण्यात आली. विविध प्रभागातील महत्त्वाच्या रस्त्यांवर आणि प्रदूषणप्रवण परिसरांमध्ये ही फवारणी करून धूळकणांचे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

विविध उपाययोजना नियमितपणे राबविणार

वाहतुकीची सततची वर्दळ, रस्त्याचे कामे आणि कोरडे वातावरण यामुळे निर्माण होणाऱ्या धुलीकणांमुळे परिसरातील हवा दूषित होत असल्याचे दिसून येते. नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळावे, यासाठी सतत प्रयत्नशील असून आगामी काळातही शहरातील विविध भागांमध्ये पाण्याची फवारणी, स्वच्छता मोहिमा आणि धुलीकण नियंत्रण उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येतील, असे पालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात येत आहे.

वसईत नामांकित कंपन्यांचे नाव वापरून बनावट घरगुती उत्पादने तयार

वसई। वसई पूवेर्तील एका गोदामात विविध नामांकित कंपन्यांचे नाव वापरून बनावट घरगुती उत्पादने तयार करून त्याची विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वसई पूर्वेच्या भागात कामण देवदळ परिसर आहे. मागील काही वर्षात या भागात विविध प्रकारचे कारखाने उभे राहिले आहेत. याच भागातील ममता कंपाऊंड येथील गाळ्यात नामांकित कंपन्यांचे नाव व लोगो वापरून बनावट उत्पादने तयार केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.फिल्ड मॅनेजर म्हणून कार्यरत असणारे शितलकुमार झा यांच्या निदर्शनास हा प्रकार आला होता.

गुरुवारी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनंतर सोमवारी नायगाव पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांकडून अनधिकृत गाळ्याच्या ठिकाणी छापा टाकून बनावट माल जप्त केला. यात हँडवाश, टूथपेस्ट, जंतुनाशक, साफसफाईसाठी वापरण्यात येणारे फिनाईल, भांडी घासण्याचा साबण, केसांना लावण्याचे तेल असा बनावट माल, नामांकित कंपनीच्या नावाचे आणि लोगोचे स्टिकर, हुबेहूब दिसर्णाया उत्पादनांच्या बनावट बाटल्या व बुच असा ८ लाख ८० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. बनावट उत्पादने बाजारात कशी आली? यामागे नेमकी कोणती टोळी सक्रिय आहे? याबाबतही पोलीस तपास करत आहेत.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com